म. ग्रं सं. ठा
विषय का
वा. नं.
१९६

श्री

# अभिनवकादंबरी.

नं. १९८६
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
संग्रहालय क्रमांक ६१८
लेखक ग. रा. मोगरे
पुस्तकाचें नांव श्री

वा. काव्य
९८६

श्री

# अभिनवकादंबरी.

ह्या

धुंडिराजकविकृत मूल काव्याचें हें

मराठी भाषांतर

गंगाधर रामचंद्र मोगरे

यांनीं केलें;

तें

सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदून

मुंबईत,

"निर्णयसागर" छापखान्यांत छापिलें.

१८८६.

किंमत पांच आणे.

काव्य ९.५.१

# समर्पण

फुलतात मोगऱ्याच्या
वेलीवर ज्या सुरम्य दोन कळ्या;
पाहून ज्यांस फुटती
हर्षरसाच्याच मन्मनीं उकळ्या; १
अवलोकुनी जयांची
उत्कंठा हा प्रयत्न केला मीं;
साहाय्यही जयांनीं
केलें मज फार फार ह्या कामीं; २
तो नीलकंठनंदन
केशव, आनंदतनय रामहि तो,
ह्या दोघांहि कुमारां
अर्पण सप्रेम काव्य हें करितों. ३
घ्या घ्या ! कुमार हो घ्या !
अभिनवकादंबरी करीं घ्या ही !
देतों तुह्मांस कीं, ही
तुमच्या योगेंच हा सुदिन पाही. ४

## प्रस्तावना.

गीर्वाण वाग्वधूचा परिचय कांहींच ज्या नसे झाला,
प्रतिकृति तिची कशी हो यावी निर्दोष रेखितां त्याला? १
ऐसें असोनि केला आहे हा यत्न होउनी धीट;
वाइट बरा ह्मणावा सुज्ञांनीं पारखोनियां नीट. २
पडलें कोठें कोठें ह्यांत मला मूळ सोडणें भाग,
ह्मणुनी कोणीं त्याचा सहसा आणूं नये मनीं राग. ३
थोडा बहु या ग्रंथीं अंश गुणाचा असेल जो कांहीं,
सत्यन्यायें त्यावर माझा लवमात्र वारसा नाहीं. ४
विद्वज्जन हो! त्याचें द्या कांहीं श्रेय धुंडिरायातें,
कीं प्रेरणा तयाच्या सुरस गिरेचीच होय ही मातें. ५
जो हा गोड कथारस यत्नें आह्मांस पाजिता झाला,
द्या हो कांहीं त्याही नारायणराव गोडबोल्याला. ६
कांहीं लहानग्या त्या दोन्ही पुतण्यांस माझिया द्यावें,
साहाय्येंचि जयांच्या हा माझा हेतु सिद्धिला पावे. ७
उरलें श्रेय समग्रहि द्या लक्ष्मण रामचंद्र वैद्याला,
यदनुग्रहेंच केवळ इतक्या रूपास यत्न हा आला. ८
हा गुणविभाग ऐसा होउनि उरतील दोष मग जितके,
बुध हो! माझ्या पदरीं घाला निःशंक मोजुनी तितके. ९

## 'अभिनवकादंबरी'तील विशेष पात्रें.

**शूद्रक.**—विदिशापुरीचा राजा. ( पूर्वजन्मींचा चंद्रापीड )

**चंद्रापीड.**—पुंडरीकाच्या शापामुळें भूलोकावरील चंद्राचा अवतार.

**वैशंपायन.**—शुकनास प्रधानाचा मुलगा आणि चंद्रापीडाचा मित्र. ( पूर्वजन्मींचा पुण्डरीक. हाच पुढें महाश्वेतेच्या शापामुळें शुक होऊन जाबालीजवळ होता ).

**श्वेतकेतु.**—एक महाऋषि. ( ह्यापासून लक्ष्मीच्या पोटीं पुण्डरीक जन्मला. )

**इंद्रायुध.**—चंद्रापीडाचा आवडता घोडा. ( पूर्वजन्मींचा कपिञ्जल ).

**लक्ष्मी.**—पुण्डरीकाची आई, जिनें चाण्डालीरूपानें वैशंपायन—शुक शूद्रकराजास आणून दिला.

**पत्रलेखा.**—चंद्रापीडाची अनुचरी. ( स्वर्लोकींची रोहिणी )

**मुनि.**—दक्षाची एक कन्या.

मराठी
मा. ९८५/१

# मराठी ग्रंथकारांस प्रार्थना.

ह्मणतात जे-'मराठी भाषा होणार ही असे नष्ट;
'मिळणार काय करुनी व्यर्थ हिला वांचवावया कष्ट?' १
त्यांना हेंच पुसा कीं, मरणोन्मुख होय आपली माय,
ह्मणुनी औषध कांहीं पुत्रीं देऊं नये तिला काय? २
माता तशी स्वभाषा सेवाया होय आपणां उचित;
किंबहुना? मातेहुनि अधिक हिची योग्यता असे खचित. ३
दे जन्म मात्र माता, भाषा व्यवहार चालवी सकळ;
मातेशिवाय जन्महि जाय, न भाषेशिवाय एक पळ. ४
रक्षी ह्मणूं, तरी ती बाल्यापुरतीच काळजी वाहे;
आबालवृद्धरक्षण-कार्यी ही दक्ष सारखी राहे. ५
उपकार थोर ऐसे नित्य जिचे आपणांवरी होती,
हो कां दीन, कधीं नच योग्य उपेक्षावया तरी हो ती. ६
ह्यास्तव ज्या कोणां ह्या निजभाषेचा असेल अभिमान,
देवोत सादरें मम विनतिकडे ग्रंथकार ते कान. ७
ज्यांच्या पराक्रमांचीं आनंदें गातसां तुह्मीं गाणीं,
त्या शूर पूर्वजांची तुमच्या ही चालली लया वाणी! ८
त्यांचें तुमचेंहि तुह्मां राखायाचें असेल नांव, तरी
द्या हात हीस द्या हो, पुण्याचें श्रेय घ्यावया पदरीं. ९

कोणी साह्य करो, वा न करो; कर्तव्य होय जें कर्म,
केलेंच पाहिजे तें; श्रेयस्कर हाच आपणां धर्म. १०
जातां कशास राज-द्वारीं ? मिळणार काय हो तेथें—
गुणदोषनिर्णयाचें काम दिलें आर्जवाकडे जेथें ? ११
स्वर्गी प्रयाण केलें जेव्हां त्या दानशूर भोज नृपें,
समजा तयींच राज-द्वारांना घट्ट लागलीं कुलपें. १२
लोकीं वदान्य राजे रंकहि आहोंत आपणाचि आजी;
देणें घेणें सर्वहि चालूं द्या आपआपसांमाजी. १३
लोकमतावरि तैसे अवलंबुनि फारसे नका राहूं;
कोणी निंदो अथवा वंदो, तिकडे कधीं नका पाहूं. १४
भ्यावें जनापवादा, तों तों भिववील फार तो कुतरा;
हव्यासही स्तुतीचा भ्रमवी जनमानसा जसा धुतरा. १५
योग्यायोग्यपरीक्षण-शिक्षेला दीर्घकाळवरि मुकलें,
भलतीकडेच ह्मणुनी आहे इकडील लोकमत झुकलें. १६
ग्रंथप्रसार पुष्कळ जनपदभाषेंत जों नसे झाला,
लागायाचें नाहीं जनमत हें तोंवरी सुमार्गाला. १७
यास्तव विद्वज्जनहो ! उघडा उघडा स्वबुद्धिभांडारें;
अज्ञानध्वांत हरा नानाग्रंथप्रकाशनद्वारें. १८
'व्यर्थ कशास लिहावे ग्रंथ, जरी त्यांस वाचकाचि नसती ?'
ह्या दुष्ट कल्पनेची होऊं देऊं नका मनीं वसती. १९
येतील जे कराया साह्य, तयां आदरें ह्मणा या या !

आ- ९२५/१



जातील दूर त्यांच्या मागें लागूं नकाच हो वायां ! २०
जे लाजतील कोणी तुमच्या लेखां धरावया हातीं,
समजा कृतघ्न पोरें झालीं उद्युक्त मातृघाता तीं. २१
जे ही स्वमाय सोडुनि परकीचा लोभ इच्छिती लटका,
सापत्नभावनेचा लागूं द्या त्यांस चांगला चटका. २२
न ह्मणा रसिकचि नुरले; दैवाचा जाहल्यामुळें कोप
आहे संप्रति त्यांना बांधवहो गाढ लागली झोंप. २३
त्यांतचि व्हावा तैसा होई ग्रंथप्रकाशही न जनीं,
निजतील कां न मग ते, सरली नाहींच मानुनी रजनी ? २४
रजनीभ्रम तो त्यांचा नाहीं निःशेष पावला नाशा,
तोंवरि चीज गुणांचें तुमच्या होईल ही नसे आशा. २५
ग्रंथप्रकाश करितां यास्तव अगदीं सरूं नका मागें;
ह्मणजे उजाडलें हें जाणुनि होतील तेच हो जागे. २६
ते जाहल्यास जागे, सदभिरुचीलागिं जागवायास
पडतात आज तैसे न तुह्मां पडतील फार आयास. २७
सदभिरुचीच्या योगें पावुनियां नित्य योग्य संस्कारा,
राहील शुद्ध होउनि जनमत त्याचा झडोनि मळ सारा. २८
मग जो तुह्मा जनाश्रय न मिळे ह्मणुनी तुह्मी असां खिन्न,
सेवा करावयाला तुमची लागेल तो अविच्छिन्न. २९
ज्यांचे करहि मराठी-ग्रंथस्पर्शें विटाळती आज,
वाटेल त्यां स्वपूर्वज ह्मणतां त्यांच्याच वंशजां लाज. ३०

जे झांकितात संप्रति येतां पाहुनि तुह्मांस दरवाजे,
कीर्त्यर्थ तेहि तुमच्या भजनीं रततील छत्रधर राजे. ३१
क्षयरोगमुक्त अंतीं तुमची होऊन देशभाषा ही,
तुमच्या भव्य यशानें भरुनी टाकील हो दिशा दाही. ३२
करितां प्रयत्न इतकें श्रेय खरोखर मिळेल या कामीं,
करवे न ही प्रतिज्ञा; इतकें तरि सांगतों तुह्मांला मी, ३३
कीं, सिद्ध यत्न होतां, क्लेश महाराष्ट्र भारतीचे या
होऊन नष्ट, लोकीं निःसंशय पात्र व्हाल या श्रेया. ३४
दुर्दैवानें तुमचे यत्न जरी हे न शेवटा गेले,
झालें स्वधर्मरक्षण; समजा मोठेंच कार्य हें केलें. ३५
दोन्हीकडोनि अंतीं लाभाची जोड आपणां आहे;
यास्तव तरी करा हो इतका हा कार्यभाग उत्साहें! ३६
आला प्रसंग ह्मणुनी गेलों बोलून शब्द जे चार,
घ्या गोड मानुनी ते बुध हो असले जरी कडू फार. ३७

का. काव्य
१८५/७
काव्य १०८७

श्री.

# अभिनवकादंबरी.

बालपणांतचि मजला कवितेचा घालुनी धडा जो दे,
ग्रंथारंभीं आधीं नमितों त्या श्रीधरास मी मोदें. १
जो फार शारदेच्या कंठाला शोभवीतसे हार,
शून्याकार जयाविण दिसतें तीचें तिलाच भांडार; २
श्रीधरसाच मला जो वंद्य, श्रीमन्मयूर कविवर तो
वंदोनि, तत्प्रसादें काव्य रचायास हें पुढें सरतों. ३
निजपंचबाणबळ ज्या एका बाणेंच पावता मदन,
स्वैर क्रीडायाचें वाग्देवीचेंहि रम्य जो सदन; ४
जी त्या बाणकवीची सुरुचिर कादंबरीकथा सुरभी
नवरससारें रसिकां तृप्त कराया असे सदैव उभी; ५
दोहून तीस अभिनव सार तिचें धुंडिराज जें काढी,
हा मोगराहि आजी तेंच महाराष्ट्रवाचकां वाढी. ६

कोणी साह्य करो, वा न करो; कर्तव्य होय जें कर्म,
केलेंच पाहिजे तें; श्रेयस्कर हाच आपणां धर्म. १०
जातां कशास राज-द्वारीं ? मिळणार काय हो तेथें—
गुणदोषनिर्णयाचें काम दिलें आर्जवाकडे जेथें ? ११
स्वर्गी प्रयाण केलें जेव्हां त्या दानशूर भोज नृपें,
समजा तयींच राज-द्वारांना घट्ट लागलीं कुलपें. १२
लोकीं वदान्य राजे रंकहि आहोंत आपणाचि आजी;
देणें घेणें सर्वहि चालूं द्या आपआपसांमाजी. १३
लोकमतावरि तैसे अवलंबुनि फारसे नका राहूं;
कोणी निंदो अथवा वंदो, तिकडे कधीं नका पाहूं. १४
भ्यावें जनापवादा, तों तों भिववील फार तो कुतरा;
हव्यासही स्तुतीचा भ्रमवी जनमानसा जसा धुतरा. १५
योग्यायोग्यपरीक्षण-शिक्षेला दीर्घकाळवरि मुकलें,
भलतीकडेच ह्मणुनी आहे इकडील लोकमत झुकलें. १६
ग्रंथप्रसार पुष्कळ जनपदभाषेंत जों नसे झाला,
लागायाचें नाहीं जनमत हें तोंवरी सुमार्गाला. १७
यास्तव विद्वज्जनहो ! उघडा उघडा स्वबुद्धिभांडारें;
अज्ञानध्वांत हरा नानाग्रंथप्रकाशनद्वारें. १८
'व्यर्थ कशास लिहावे ग्रंथ, जरी त्यांस वाचकाचि नसती ?'
ह्या दुष्ट कल्पनेची होऊं देऊं नका मनीं वसती. १९
येतील जे कराया साह्य, तयां आदरें ह्मणा या या !

जातील दूर त्यांच्या मागें लागूं नकाच हो वायां ! २०
जे लाजतील कोणी तुमच्या लेखां धरावया हातीं,
समजा कृतघ्न पोरें झालीं उद्युक्त मातृघाता तीं. २१
जे ही स्वमाय सोडुनि परकीचा लोभ इच्छिती लटका,
सापत्नभावनेचा लागूं द्या त्यांस चांगला चटका. २२
न ह्मणा रसिकचि नुरले; दैवाचा जाहल्यामुळें कोप
आहे संप्रति त्यांना बांधवहो गाढ लागली झोंप. २३
त्यांतचि व्हावा तैसा होई ग्रंथप्रकाशही न जनीं,
निजतील कां न मग ते, सरली नाहींच मानुनी रजनी ? २४
रजनीभ्रम तो त्यांचा नाहीं निःशेष पावला नाशा,
तोंवरि चीज गुणांचें तुमच्या होईल ही नसे आशा. २५
ग्रंथप्रकाश करितां यास्तव अगदीं सरूं नका मागें;
ह्मणजे उजाडलें हें जाणुनि होतील तेच हो जागे. २६
ते जाहल्यास जागे, सदभिरुचीलागिं जागवायास
पडतात आज तैसे न तुह्मां पडतील फार आयास. २७
सदभिरुचीच्या योगें पावुनियां नित्य योग्य संस्कारा,
राहील शुद्ध होउनि जनमत त्याचा झडोनि मळ सारा. २८
मग जो तुह्मा जनाश्रय न मिळे ह्मणुनी तुह्मी असां खिन्न,
सेवा करावयाला तुमची लागेल तो अविच्छिन्न. २९
ज्यांचे करहि मराठी-ग्रंथस्पर्शें विटाळती आज,
वाटेल त्यां स्वपूर्वज ह्मणतां त्यांच्याच वंशजां लाज. ३०

नृपसुत बालपणांतचि सर्वहि विद्याकलाध्ययन करुनी,
तोषे स्वपित्यापासुनि रत्नें इंद्रायुधादिकें वरुनी. २५
मायावती तयाची मायहि तांबूल द्यावया त्यासीं,
दे एक पत्रलेखा नांवाची पाठवूनियां दासी. २६
ती त्याच्या प्रेमाचें पात्रचि होऊनि राहती झाली;
किंबहुना, निजहृदयचि दुसरें ती त्यास वाटली आली. २७
विनयी, सुशील, लोक-प्रिय निजसुत हें विलोकुनी ओपी,
त्या यौवराज्य राजा, त्यावरि निजराज्यभारही सोंपी. २८
चंद्रापीड निघे मग दिग्विजया राजनंदनांसहित;
जिंकून पूर्व, दक्षिण, पश्चिम, ये उत्तरेकडे त्वरित. २९
तिकडे हिरण्यनगरीं किंपुरुषांचा विलोकुनी जोडा,
लागे त्याच्या मागें नृपसुत वेगें पिटाळुनी घोडा. ३०
त्यांनीं आशा दावुनि, मागें लावुनि बराच दूरवर
नेऊन, गुप्त होउनि, अंतीं केला निराश भूपवर. ३१
मार्गश्रमें तृषेनें पीडित होऊनि धुंडितां तोय,
अच्छोदाख्य सरोवर पाहुनि तो हृष्ट मानसीं होय. ३२
तद्दर्शनेंच त्याच्या चित्तांतिल खेद सर्वही हरला;
प्याला यथेच्छ जलही स्वाद सुधेचाच ज्यामधें भरला. ३३
पाणी पिऊन नृपसुत बसला असतां तटीं तडागाच्या,
पडता झाला कर्णीं मधुर मनोहारि गीतरव त्याच्या. ३४

कोणीकडून येतो गाण्याचा नाद तो पहाया हें
हरिणामागुनि जातां, सिद्धालय रम्य एक तो पाहे. ३५
शशिशेखरास भावें अर्चुनि वीणा धरूनियां हातीं,
तिकडे एक कुमारी शिवमहिमा गात बैसली होती. ३६
चंद्रप्रभेप्रमाणें यत्तनुची गौरकांति लखलखित,
ऐशा त्या तरुणीला पाहुनि नृप होय मानसीं चकित. ३७
तद्रूपसंपदेनें तेंवि तिच्या त्या मनोहरें गीतें
पावून मोह, पाहे वृत्त विचारावया तिचें तीतें. ३८
गायन समाप्त होतां वंदुनि ईशा प्रदक्षिणा करुनी,
फेंकी नृपाकडे ती अमृतोपम दृष्टि आपली तरुणी. ३९
'या आश्रमीं' ह्मणे ती 'पूज्य अतिथि मज तुह्मी, बरें आलां !'
तद्वागमृतें होउनि तृप्त नरेश्वर तिच्या सवें गेला. ४०
ती स्वाश्रमीं सुकेशी नेउनि बसवुनि सुखासनीं त्याला,
विधिवत् पूजुनि बोले 'कोण असां ? कोठुनी इथें आलां?' ४१
तो किन्नरानुगमनापर्यंत तिला स्वजन्मवृत्त कथी;
तेव्हां स्नेहें तीहि द्रवली तद्गुणविमोहिता सुदती. ४२
सरुनि पुढें मग विनयें नमुनि तिला तो विचारिता झाला,
'निजजननें आर्येनें भूषित सुरवंश कोणता केला ? ४३
'निःशेष लाजवावी लावण्यें चंद्रिका जिच्या ऐशी,
'कांति प्रकट शरीरीं आर्येच्या होय ही तरी कैशी ? ४४

'सर्वेहि सुखोपभोगीं विरक्ति नवयौवनींच कां घडली?
'इतकी कां आर्येची प्रीति तपस्येवरी असे जडली?' ४५
पुसतां असें नृपें ती मौनें निःश्वास दीर्घ टाकून,
भिजवी निजाश्रुपातें धरणी स्वकरें मुखास झांकून. ४६
पाहुनि तिची दशा ती, अपराधी आपणास भावून,
तन्नयनें क्षाळाया नृप जल आणी स्वयेंच जाऊन. ४७
प्रक्षालुनि निजमुख निज-जन्मकथा ती कथीतसे त्याला,
'ऐक' ह्मणे 'कथितें मी तुज संक्षेपें स्ववृत्त भूपाला!' ४८

असती कुळें चतुर्दश सुरगणिकांचीं प्रसिद्ध जीं भुवनीं,
**श**शिकरज त्यांतलें जें माझी त्यामाजि जन्मली जननी. ४९
**गं**धर्वीपासुनि जो झाला **दा**क्षायणी **अ**रिष्टेला,
तो **हं**स तात माझा; **गौ**री ह्मणती मदीय मातेला. ५०
राजा **गं**धर्वांचा झाला मत्तात **किं**पुरुषवर्षी,
क्रीडाविलास **गौ**री-सह चिर करुनी दिन क्रमी हर्षी. ५१
पोटीं त्या सुभगांच्या दुर्भाग्या मीच एकटी दुहिता;
मज्जन्मीं बहु उत्सव करुनि दिलें नाम मज **म**हाश्वेता. ५२
गेलें बाल्य सुखानें, यौवनपदवीस पावती झालें;
स्नानार्थ एकदां ह्या **अ**च्छोदीं माउलीसवें आलें. ५३
करुनी स्नान सखीसह लीलेनें हिंडतां सरोरोधीं,

ग्रं क्र. १६५



पुष्पसुगंध तिथें ये कोठुनि ह्याच्याच लागलें शोधीं. ५४
तों पाहिला पथीं म्यां एक तरुण मदनमूर्ति मुनितनुज;
जीं मंजरी वसे तत्-कर्णीं मोही तिचाच गंध मज. ५५
बघतांच त्यास निजशर मजवर तत्काळ पंचशर मारी;
तेणें व्यथित न हृदयचि विव्हल अंगेंहि जाहलीं सारीं. ५६
जवळी होता त्याचा मित्र तया मी करोनियां नमन,
वदलें 'कोण असे हा मुनि? कैसें ह्यास हें मिळे सुमन.' ५७
'कुतुकें पुससि' ह्मणे तो 'ऐक असे श्वेतकेतुनाम मुनी;
'पुरला काम रमेचा रूपश्रीलाच त्याचिया बघुनी. ५८
'तत्काळ श्री प्रसवे सुत, ती मुनिचा ह्मणून त्या तो दे;
'स्वीकारुनी मुनीश्वर नाम तया पुंडरीक दे मोदें. ५९
'तो लक्ष्मीचा नंदन विद्वान् झाला पितृप्रसादें हा;
'कैलासाहुनि मज सह येतां परतून आज निज गेहा, ६०
'ठेवी ह्याच्या कर्णीं ह्याला बघतांच नंदनश्री ही
'मंदारमंजरी, जी स्वसुगंधें सुंदरी तुला मोही.' ६१
तंव तो तरुणहि कुतुकें मज बोले 'स्पष्ट काय तें सांगें!
'तुज पाहिजेच तरि ही घे, मग संकोच हा कशाला गे?' ६२
वदुनि असें निजकर्णा-वरुनी काढून मंजरी त्यानें
सस्पृह पहात मन्मुख मत्कर्णीं ठेविली स्वहस्तानें. ६३
त्याच्या करांगुलीचा होतांचि स्पर्श माझिया गाला,

विदिशापुरींत होता शूद्रक राजा करीत राज्यातें;
दे कीर एक गुणवान् कोणी चांडाळकन्यका त्यातें. ७
निजपाद एक उचलुनि वदुनि 'तुझा जय असो सदा राया!'
वर्णी कीर नृपाचा अतुल पराक्रम रचोनि ही आर्या. ८
"[1]त्वद्रिपुनारीस्तनयुग अंतःशोकाग्निसन्निहित राया!
"अश्रुस्नात विमुक्ता-हार जणों राहिलें तप कराया!" ९
गुणरत्ननिधिच हा हें जाणुनि कुतुकें तयास नृप बोले,
'असशी कोण शुका तूं? सांग तुझें जन्मही कुठें झालें?' १०
कीर ह्मणे-मी जन्मा आलों पंपासरस्तटीं राया!
माय तयींच मरे, मज ह्मणुनि पित्याचीच लागली माया. ११
असतां पित्यासवें मी, एके दिवशीं करावया मृगया
येता झाला एक व्याध महाक्रूर आमच्या ठायां. १२
गेला मज्जनकासह अगणित कीरांस मारुनी नीच;
दैवें काळमुखांतुनि सुटुनि तयीं एक वांचलों मीच. १३
मार्गी लोळत असतां मुनिवर हारीत पाहुनी मातें,
जाई निजाश्रमातें घेउनि मज येउनी दया त्यातें. १४
सर्व ऋषींस ह्मणे मज पाहुनि हारीततात जाबालि-

---

१ कै. परशुरामपंत तात्या गोडबोले ह्यांनीं केलेल्या कादंबरीच्या भाषांतरांतूनच ही आर्या घेतली आहे. कारण, मूल पद्याचें भाषांतर निदान मला तरी इतकें चांगलें व आटोपशीर करितां यावयाचें नाहीं.

'ऐका कथितों कैशी ह्याची ह्या धृष्टता फळा आली.' १५

झाला अवंतिदेशीं तारापीडाख्य एक भूमिपती;
जैशी रति स्मराची भार्या त्याची तशी विलासवती. १६
न्हता मुळींच पोटीं पुत्र करी ती बहु व्रतें ह्मणुनी;
त्या तीच्या पुण्यानें झालीं संतुष्ट दैवतें स्वमनीं. १७
एके रात्रीं स्वप्नीं होय असा नरपतीस दृष्टांत,
कीं शिरला स्वस्त्रीच्या वदनीं प्रत्यक्ष रोहिणीकांत. १८
प्रातःकाळीं उठुनी शुकनासाख्य प्रधान जो त्याला
स्वप्नांतील समस्तहि वृत्त क्षितिपाळ सांगता झाला. १९
ऐकुनि अमात्य बोले-'चंद्रासम पुत्र आपल्या पोटीं,
'येईल सत्य राया! माझी वाणी ह्मणूं नका खोटी! २०
'दृष्टांत आज रात्रीं स्वप्नीं मजही असाच एक घडे,
'कीं मत्प्राणसखीच्या अंकावर दिव्य पुंडरीक पडे.' २१
कांहीं काळें प्रसवे अनुपम राजांगना कुमारमणि;
प्रसवे तयींच गुणि सुत सचिवाचीही मनोरमा रमणी. २२
राजा देई चंद्रा-पीड असें योग्य नाम तनयाला,
वैशंपायनसंज्ञा सुत सचिवाचाहि पावता झाला. २३
सचिवसुतावर बाल्यापासूनचि नृपसुतानुराग जडे;
असला पिताहि जवळी तरि त्याविण त्या कधीं न चैन पडे. २४

'सर्वेहि सुखोपभोगीं विरक्ति नवयौवनींच कां घडली?
'इतकी कां आर्येची प्रीति तपस्येवरी असे जडली?' ४५
पुसतां असें नृपें ती मौनें निःश्वास दीर्घ टाकून,
भिजवी निजाश्रुपातें धरणी स्वकरें मुखास झांकून. ४६
पाहुनि तिची दशा ती, अपराधी आपणास भावून,
तन्नयनें क्षाळाया नृप जल आणी स्वयेंच जाऊन. ४७
प्रक्षालुनि निजमुख निज-जन्मकथा ती कथीतसे त्याला,
'ऐक' ह्मणे 'कथितें मी तुज संक्षेपें स्ववृत्त भूपाला!' ४८

असती कुळें चतुर्दश सुरगणिकांचीं प्रसिद्ध जीं भुवनीं,
शशिकरज त्यांतलें जें माझी त्यामाजि जन्मली जननी. ४९
गंधर्वापासुनि जो झाला दाक्षायणी अरिष्टेला,
तो हंस तात माझा; गौरी ह्मणती मदीय मातेला. ५०
राजा गंधर्वांचा झाला मत्तात किंपुरुषवर्षी,
क्रीडाविलास गौरी-सह चिर करुनी दिन क्रमी हर्षी. ५१
पोटीं त्या सुभगांच्या दुर्भाग्या मीच एकटी दुहिता;
मज्जन्मीं बहु उत्सव करुनि दिलें नाम मज महाश्वेता. ५२
गेलें बाल्य सुखानें, यौवनपदवीस पावती झालें;
स्नानार्थ एकदां ह्या अच्छोदीं माउलीसवें आलें. ५३
करुनी स्नान सखीसह लीलेनें हिंडतां सरोरोधीं,

ना क्र॰ १८५



पुष्पसुगंध तिथें ये कोठुनि ह्याच्याच लागलें शोधीं. ५४
तों पाहिला पथीं म्यां एक तरुण मदनमूर्ति मुनितनुज;
जीं मंजरी वसे तत्-कर्णीं मोही तिचाच गंध मज. ५५
बघतांच त्यास निजशर मजवर तत्काळ पंचशर मारी;
तेणें व्यथित न हृदयचि विव्हल अंगेंहि जाहलीं सारीं. ५६
जवळी होता त्याचा मित्र तया मी करोनियां नमन,
वदलें 'कोण असे हा मुनि? कैसें ह्यास हें मिळे सुमन.' ५७
'कुतुकें पुससि' ह्मणे तो 'ऐक असे श्वेतकेतुनाम मुनी;
'पुरला काम रमेचा रूपश्रीलाच त्याचिया बघुनी. ५८
'तत्काळ श्री प्रसवे सुत, ती मुनिच्या ह्मणून त्या तो दे;
'स्वीकारुनी मुनीश्वर नाम तया पुंडरीक दे मोदें. ५९
'तो लक्ष्मीचा नंदन विद्वान् झाला पितृप्रसादें हा;
'कैलासाहुनि मज सह येतां परतून आज निज गेहा, ६०
'ठेवी ह्याच्या कर्णीं ह्याला बघतांच नंदनश्री ही
'मंदारमंजरी, जी स्वसुगंधें सुंदरी तुला मोही.' ६१
तंव तो तरुणहि कुतुकें मज बोले 'स्पष्ट काय तें सांगें!
'तुज पाहिजेच तरि ही घे, मग संकोच हा कशाला गे?' ६२
वदुनि असें निजकर्णा-वरुनी काढून मंजरी त्यानें
सस्पृह पहात मन्मुख मत्कर्णीं ठेविली स्वहस्तानें. ६३
त्याच्या करांगुलीचा होतांचि स्पर्श माझिया गाला,

दोघांच्याही हृदयीं कामाग्नीच्या धडाडल्या ज्वाला. ६४
भान नसे त्या गळली स्मरणी हातांतली जरी खालीं;
झेलुनि वरचेवर ती प्रेमें मी आपल्या गळां घालीं. ६५
आईच्या आज्ञेनें जातां मी परत तो मला वदला,
'स्मरणी हरून माझी पदहि पुढें टाकणें न योग्य तुला.' ६६
परिसुनि ह्या तद्वचना 'ही घ्या' ऐसें वदोनियां त्यातें,
मुक्तावली स्वकीया दिधली म्यां त्यास आपल्या हातें. ६७
ये ममसखी तरलिका मजमागें तो पुसे तियेस ह्मणीं,
'कोण, कुणाची कन्या, कोठें ही आज जातसे तरुणी?' ६८
मद्वृत्त मत्सखीनें कथितां सप्रेम तीस सांगे तो,
'एकांतीं स्वसखीला दे हा जो लेख मी तुला देतों.' ६९
लेख तमालरसें तो वल्कलपट्टावरी लिहुनि देई,
तो घेउनी सखीही माझी मजमागुनी त्वरित येई. ७०
'झुरसी यद्विरहें हें पत्र तयानें दिलें' ह्मणे आली;
विरहानलतप्तेला मज ती संजीवनी तयीं झाली. ७१
पानपुड्यांतुनि काढुनि देतां मज पत्र तें तिनें, पाहें
तों त्यामध्यें आर्या आर्यानें एक ही लिहिलि आहे. ७२
'बिसंसित मुक्ताहारें लागुनि लोभास हंस जो गेला,
'तद्वन्मानसजन्मा माझाही दूर गे तुवां नेला.' ७३

---

१ कै. परशुरामपंत तात्या गोडबोलेकृत.

ह्या पत्राशय कळतां पुनरपि कामाग्नि मन्मना जाळी;
मी कोण, कोण ती, मी आहें कोठें, कळे न त्या काळीं. ७४
तों छत्रधारिणी मम मज सांगे 'मुनिकुमार कासारीं
'जे दोघे पाहियले, त्यांपैकीं एक पातला द्वारीं.' ७५
'जा शीघ्र घेउनी ये त्याला'-ही ऐकतांच मम वाणी,
ती जाउनी त्वरेनें मजजवळी त्या कपिंजला आणी. ७६
बघतांच त्या मुनिसुता सत्कारुनि, काय बोलतो तो हें
ऐकावया तयाच्या संमुख मी जाउनी उभी राहें. ७७
'वांचीव त्वद्विरहानलविकला ममसख्यास' तो वदला,
'कर जोडितों पहा हे, ह्यावरि करि योग्य जें दिसे तुजला.' ७८
सांगून पाठवावें काय तया ह्या विवंचनेमाजी
असतां मी, ममसदनीं इतक्यांतचि माय येतसे माजी. ७९
पाहुनि मज्जननीला मजशि न पुसतां निघून तो जाई;
कुशलप्रश्न करोनी मजला, माझीहि जातसे आई. ८०
माता जातां, रात्रीं जिकडे मद्विरहतप्त तो होता
मुनिसुत, तिथें सखीसह मीहि निघें जावयास विरहार्ता. ८१
मार्गीं परिसुनि रोदनरव, मी दचकून काय हें घडलें
बघतां, रडे कपिंजल तत्सखशावही महीवरी पडलें. ८२
कारण तन्मरणा 'मी होय,' असें गणुनि फार ही रडली;
सहगमनास निघें तों कर्णीं ही दिव्यपुरुषगी पडली. ८३

'साहस न करीं वत्से! पुढति समागम घडेल तुज याचा–'
आश्वासुनी असें मज तो स्वर्गी देह नेतसे त्याचा. ८४
'काय प्रकार हा' ही पृच्छा मी त्या कपिंजलास करीं;
त्या माझ्या प्रश्नाचें उत्तर कांहींच देउनी न तरी, ८५
'कोठें तूं मन्मित्रा घेउनि जातोस?' दिव्य पुरुषाला
ऐसें पुसतांचि तोही निजमित्राच्या समागमें गेला. ८६
तेव्हांपासुनि मी त्या दिव्यगिरेचा धरोनि विश्वास,
बसलें वनीं प्रियातें चिंतित सोडुनि सुखोपभोगांस. ८७
ती स्तब्ध होय ऐशी सांगुनि ही आपली कथा सारी;
चंद्रापीडहि बोले पुनरपि आश्चर्य पावुनी भारी. ८८
राव ह्मणे 'आर्येची आहे ती तरलिका सखी कोठें?'
हंसी वदे–नृपसुता! ऐक दुजें नवल सांगतें मोठें. ८९
जें एक अप्सरांचें कुळ अमृतोद्भव असे प्रसिद्ध जनीं,
राया! मदिरा नामें देवीचें त्या कुळांत होय जनि. ९०
गंधर्वापासुनि ये जो दक्षसुता मुनीच्चिया उदरा,
किंपुरुष वर्षनाथा चित्ररथा त्या वरीतसे मदिरा. ९१
मदिराचित्ररथां त्या झाली एकचि सुलक्षणा कन्या,
सौंदर्याची परमा सीमा कादंबरी महा धन्या. ९२
ती बालमित्र मम मज मीहि तिला होय जीव कीं प्राण;
संगीतशास्त्र सारें दोघी शिकलों बरोबरचि जाण. ९३

वा. कृ. १८५



माझें दुःख विलोकुनि तीहि करी पण सखीजनांत असा
कीं 'जों अकृतार्थ सखी माझी तों मी न वर वरीं सहसा.' ९४
निश्चय निजकन्येचा मातापितरां कळून हा राही,
अन्योन्यस्नेहास्तव वदति न तीं आमच्या तरी कांहीं. ९५
आला आहे आजचि मजला त्यांच्याकडोनि संदेश
कीं-'वत्से त्वां कांहीं करिजे कादंबरीस उपदेश.' ९६
कारण ह्या गोष्टीला मीच, ह्मणुनि ऐकतां निरोपा या,
देवीकडे तरलिका प्रेषीं मी हा स्वहेतु कळवाया ९७
कीं 'जीवंत पहावें मज तुज इच्छाच ही नसेल जरी,
'अव्हेरुनि मद्वच हें निजगुरुवचनास मोडशील तरी.' ९८
देउनि निरोप हा मीं स्वसखी नुकतीच धाडिली तिकडे,
तीच्या मागोमागचि आपणही प्राप्त जाहलां इकडे. ९९

ऐसें वदोनियां ती पडली मौनेंच आपल्या शयनीं,
नाई निजावयाला रावहि पावूनि विस्मय स्वमनीं. १००
केयूरासह परतुनि दुसरे दिवशींच तरलिका आली;
वंदन करोनियां ती हंसकुमारीस सांगती झाली. १०१
'आहे तुझ्याकडे ह्या निजवीणावाहकास पाठविलें
'आर्येनें, ह्यापासुनि घ्यावें त्वां वृत्त ऐकुनी तिथलें.' १०२
कादंबरिचा निश्चय ऐकुनि केयूरकाननें, त्यास

हंसी बोले 'जा तूं करित्यें येऊन मीच कार्यास.' १०३
केयूरक गेल्यावर चंद्रापीडा ह्मणे महाश्वेता,
'किन्नरभू बहु रम्या रमवी गंधर्वपुरहि बहु चेता. १०४
'साधी असे स्वभावें महानुभावा सखीहि ती माजी;
'अडचण नसल्यास तिला जाऊं भेटावया चला आजी.' १०५
तिजला ह्मणे नराधिप 'भगवति मज हें विचारितां काय?
'न्या वाटेल तिथें, हा संप्रति तुमच्चाच जाहला काय.' १०६
अश्वारूढ क्षितिपति तिजसह गंधर्वराजनगराला
जाउनि, विचित्र शोभा पाहत कादंबरीगृहा आला. १०७
बघुनि महाश्वेतेला धांवुनि घालुनि तिच्या गळां हात,
कुशलप्रश्न तिला करि हरिखुनि कादंबरी स्वचित्तांत. १०८
हंसीहि कुमारार्च देवीला सांगुनी कथा सारी,
बोले; 'गडे मला हा प्राणापेक्षांहि आवडे भारी. १०९
'नरमणि गुणगणनिधि हा निजलावण्यें स्मराभिमान हरी,
'ह्यावरि लोभ सखे तूं मजवरि करिशी तसाच नित्य करीं.'
आधींच पावली जी मोह तयाच्या विलोकुनी रूपा,
स्वसखीवचनें स्वासन देउनि बसवी समीप ती भूपा. १११
देवी ही मदलेखे-करवीं धुववून राजपुत्रपदां,
धुवुनी स्वयें सखीचे पाय, बसे स्वस्थळीं वरोनि मुदा. ११२
अन्योन्यांस पहातां अन्योन्यप्रीति मानसीं जडली;

मराठी ग्रंथ ... ठाणे

चंद्रापीडचि न स्मर-पाशीं कादंबरीहि सांपडली. ११३
सुदती सलज्ज वारं-वार तयाच्या मुखाकडे बघुनी,
वानी निजनयनांची नरलोकाचीहि धन्यता स्वमनीं. ११४
रावहि पाहुनि तिजला भावी श्रम आपले सफल झाले,
किन्नरमिथुनेंही त्या उपकारचि आपणावरी केले. ११५
प्रेमें करीत असतां विनोदसंवाद एकमेकींशीं,
तांबूलदानसमयीं बोले कादंबरीप्रती हंसी;— ११६
'आजी प्रेमपुरस्सर आपण सत्कारिजे स्वयें ज्याला,
'त्यास रुचेल तरी त्वां द्यावा पहिला विडा सखे त्याला.' ११७
देवी सलज्ज बोले 'द्यावा त्यांना विडा तुवांच गडे !
'करचि सरे न कराया साहस तें, काय मी करूं तिकडे?' ११८
होतां आग्रह फारचि, देवी द्याया विडा पुढें जाय;
दे न विडाच जणूं दे मदनाज्ञेनें तयास निजकाय. ११९
तत्करसंगें सात्विक-भाव शरीरीं तिच्या प्रकट झाला;
धीरस्वभाव रावहि झांकूं न शके मनोविकारांला. १२०
जातां हंसी मदिरा-चित्ररथांच्या निमंत्रणें तिकडे,
बोले 'आज रहाया कवण स्थळ योजिलें नृपास गडे?' १२१
हंसत ह्मणे मनिं ती-जो सकलकुमारीमनोभवनवासी,
रम्यस्थान दुजें त्या देऊं मी कोणतें रहायासी? १२२
स्पष्ट वदे मग 'देउनि दर्शन मज, नाथ जो स्वयें झाला

'मच्छ्रीचा तनुचाही, सांग रहाया रुचे तिथें त्याला.' १२३
'क्रीडामणिगिरिवर ह्या स्थान रहायास दे' वदुनियां हें
हंसी गेली; क्रीडा-मणिगिरिवर नृपहि जाउनी राहे. १२४
देवी तयास झाली ज्या ज्या उपभोग्य वस्तु पाठविती,
त्या सेवुनि मध्यान्हीं बसला होता सुखासनीं नृपति. १२५
तों मदलेखा नामें देवीची आपणाकडेच सखी
ये एक रम्य सुरुचिर घेउनियां हार, तो असें निरखी. १२६
संनिध येउनि राया वंदुनि परिचारिका ह्मणे—'उदधि
'देउनि अर्थिजनातें वांटुनि सारा स्वकीय रत्ननिधि, १२७
'जो हार शेष राहे, तो हा वरुणास देउनी तर्पी;
'वरुणहि चित्ररथा दे; चित्ररथ स्वात्मजेस तो अर्पी. १२८
'देवीनें पाठविला तोच असे हा तुह्मांकडे हार;
'आहे क्षुद्र जरी हा तुमच्या रूपापुढें अलंकार, १२९
'मोडावें मन तीचें करुनि अनादर तथापि याचा हें
'नाहीं योग्य तुह्मांला, कीं पहिलाच प्रसंग हा आहे.' १३०
वदुनि असें मदलेखा घाली त्याच्या गळ्यांत तो हार;
तिजसह गुण देवीचे वर्णुनि हर्षे कुमारही फार. १३१
ती गेल्यावर, देवी घेउनि कांहीं सख्या तिथें आली;
सत्कारुनि तीस बसे भूवरि नृप, तीहि बैसली खालीं. १३२
तीस ह्मणे नृप 'इतका आदर दासास पाहिजे कां या?

'लवहि नसे मजमध्यें गुण प्रसादास पात्र ह्या व्हाया.' १३३
मोही तिला अशीं तो नानाविध मधुर भाषणें करुनी;
नेत्रकटाक्षें तैशी तीहि तयाच्या मनास घे हरुनी. १३४
केयूरका तिथें मग चंद्रापीडासमीप ठेवून,
कादंबरी स्वसदना जाय सवें निजसख्यांस घेऊन. १३५
हंसीचा थोरपणा, चैत्ररथीचा महानुराग, तसें
तत्परिजनसौजन्यहि केयूरासह नृपाळ वर्णितसे. १३६
दुसरे दिवशीं प्रातःकालीं परतून जावया नृपती
आज्ञा घे देवीची, करुनी हंसीमुखें तिला विनति. १३७
जातां निघून सविनय बोले देवीस तो नराभरण;
'दासकथा वदतां तरि ह्याचें व्हावें कधीं कधीं स्मरण'. १३८
कष्टेंच ती तया दे अनुमत, मग जावयास राव निघे;
यो गंधर्वसुतांसह अच्छोदीं तों तिथें स्वसैन्य बघे. १३९
मंत्रिसुतादिक सेना-पति सत्कारून बैसविति त्याला;
गंधर्वराजधानी-वृत्त तयां तोहि सांगता झाला. १४०
दुसरे दिवशीं तिकडे घेउनि केयूर विविध भोगां ये;
'ये ये' ह्मणून, जवळीं येतां आलिंगिलें तया रायें. १४१
निजविरहें अस्वस्था देवी ऐसें तदाननें कळतां,
'आणा आणा सत्वर अश्व' असें राव जाहला ह्मणता. १४२
ह्य आणतांचि भृत्यीं, संगें घेऊन पत्रलेखेला,

गंधर्व राजनगरा चंद्रापीड त्वरा करुनि गेला. १४३
तेथें निजविरहानें हृदय जिचें शून्य जाहलें आहे,
हिमसदनीं निजलेल्या ऐशा कादंबरीस तो पाहे. १४४
शिरतां सदनीं आधीं हंससुतेला करोनियां प्रणति,
देवीजवळचि होतें आसन जें त्यावरी बसे नृपति. १४५
मग केयूर वदे 'नृप-हृदयचि जी होउनी दुजें राही,
'तांबूलहि त्या दे जी आर्ये ती होय पत्रलेखा ही.' १४६
सत्कारून बसाया स्थळ तिजला स्वासनींच दे देवी,
मोहुनि तद्गुणरूपा प्राणाधिक लोभ तीवरी ठेवी. १४७
हर्षे स्वदर्शनें जी, भावि वियोगार्तिही जिला भय दे,
कादंबरीस ऐशा श्लेषोक्तीनें मनुष्यपाळ वदे. १४८
'कामरतिं[1] हृदिकृत्वा देवीला तीव्र ताप हा झाला?'
ऐकुनि हें मदलेखा प्रत्युत्तर योग्य देतसे त्याला. १४९
'होईल काय काय न हिजला कौमार[2]-भाव हा जडतां?'
झाला शंकावर्ता नृप ही श्लेषोक्ति ऐकुनी पडता. १५०
तत्प्रेमपाशबंधन मग कष्टें दूर सारुनी तीस
बोले राव 'पहा हा तवपदसेवेस ये पुन्हा दास.' १५१
कादंबरीस सोडुनि मग पाहे राव जावया मार्गे;

---

१ काम्+अरतिं=कोणत्या पीडेस; ( पक्षीं ) काम+रति=कामासक्ति
२ कौ ( पृथ्वींत ) मार-भाव; ( पक्षीं ) कौमारभाव.

तेव्हां केयूरमुखें विनवुनि त्या येवढेंच ती मागे १५२
कीं, ‘जातसां तरी जा, परि जा ठेवून पत्रलेखेशीं;
‘कांहीं काळ इथें ती राहुनि येईल आपल्या देशीं.’ १५३
‘देवीकृपाप्रसादा उपभोगाया इथेंच राहो ती;’
ऐसें वदोनि नृपवर जाय जिथें आपली चमू होती. १५४
तिकडे पत्र पित्याचें देती आणूनि दूत भूपवरा;
त्याचा आशय हा कीं, ‘पत्र पहातांच या निघून घरा.’१५५
वाचून पत्र, होउनि देवीविषयीं निराश राजमणि,
मंत्रिसुतावर सोंपुनि दळभार, स्वालयास जाय क्षणीं.१५६
तो आपल्या अतर्कित आगमनें हर्षवी जरी बापा,
कादंबरीवियोगें फार परी पावला स्वयें तापा. १५७
लवकरचि पत्रलेखा आली देवीकडून परतुनियां;
कादंबरीकडिल ती वृत्त निवेदी समग्र नृपतनया. १५८
ती बोले ‘किंबहुना! धरित्ये तुमच्यावरीच ती प्राणा!
‘जा जा! विलंब करितां जग हें झालेंच आंधळें जाणा.’१५९
नृप ही तिची अवस्था परिसुनि मूर्छेस तत्क्षणीं पावे;
कष्टें सावध होतां चित्तीं चिंती, कसें तिथें जावें? १६०
सिप्रातटीं कदाचित् जातां स्वसखीसमेत पाहे तो
कीं, केयूर ससेवक धांवतची आपणाकडे येतो. १६१
केयूरक नरनाथा बघुनि, दुरूनिच तया प्रणाम करी;

क्षेमालिंगन चंद्रा-पीडहि दे उठवुनी तया स्वकरां. १६२
'देवी सुखी असे कीं?' ऐसें आधीं विचारुनी राय,
त्यास वदे 'सांग मला आज्ञा केली असे तिनें काय!' १६३
तो बोले 'कुशल तिचें तेंच तुह्मी आज जें मला पुसलें.
'ती कांहीं न ह्मणाली इकडेही मज तिनें न पाठविलें. १६४
'गेला कुमार ऐशी आयकिल्यापासुनी कथा, सुदती
'शयनीं पडोनि सोडित दीर्घोच्छ्वासा अखंड धडपडती. १६५
'स्वसखी मदलेखेसह आह्मां निकटस्थितांसहहि कांहीं
'तिव्हांपासुनि अगदीं राजसुता! बोललीच ती नाहीं. १६६
' 'आहेत हीं कशाला मजपाशीं राहिलीं उभीं सारीं?'
'इतकेंच मात्र वाक्य स्वमुखें ती एकवार उच्चारी. १६७
'जाणुनि तिचें मनोगत आलों पायांसमीप धांवत या;
'जाऊन वांचवा तरि निजविरहार्तेस त्या झणीं सदया!' १६८
केयूरकवचनें ह्या मोह द्विगुणित नृपांतरा जडला;
सावध होउनि, जावें कैसें चिंतेंत ह्या पुन्हां पडला. १६९
राव विचारी चित्तीं, ताताज्ञेवीण ये कसें जातां?
काय निमित्त कथूं त्या? कीं सांगूं ती असे वियोगार्ता? १७०
कोणा पुढें करूं मी? सहाय मज कोण होय ह्या कामीं?
वैशंपायन मत्सख असता तरि योजितों तयाला मी. १७१
असतां अशा विचारीं, आजचि ये दशपुरा स्वदलभार,

ऐशी वार्ता ऐकुनि चित्तीं संतोष पावला फार. १७२
केयूरकास हर्षे नृप बोले 'द्वार जावयास मज
'झालें मत्सख येतां; देवीहि प्राप्त जाहली समज. १७३
'केयूरका! पुढें तूं जा ह्या घेऊन पत्रलेखेतें;
'मागोमाग तुझ्या मी आलों ऐसेंच जाण तूं तेथें. १७४
'जी मज करावयाची आहे विज्ञापना तिला कांहीं,
'देवीस सर्वही ती स्वमुखें कळवील पत्रलेखा ही.' १७५
स्वसखीसहि नृप बोले 'आधीं जातांच तूं तिला कळवीं,
'कीं जोडुनि करयुग हा तुजला लववूनि मस्तका विनवी. १७६
'जेणें माझें येणें विफल न व्हावें, तसेंच अंधत्वा
'हें जगहि न पावावें, ऐसें मात्र स्वयें करावें त्वां.' १७७
कथुनि तिला हें, सचिवा पुसुनी, भेटावया स्वमित्राला
एकाएकीं कांहीं भृत्यांसह भूप दशपुरा आला. १७८
तिकडे सैन्यप सारे बसले होऊनि खिन्न हें बघुनी,
कांहीं अनिष्ट घडलें, ऐसें तो होय मानिता स्वमनीं. १७९
अत्यंत खेद पावुनि झाला सर्वां विचारिता राय;—
'सांगा हो! सांगा हो! माझ्या मित्रास जाहलें काय?' १८०
सर्वहि राजकुमारा ह्मणती वंदन करोनियां शिरसा—
'आहे सजीव तुमचा मित्र, न आला परंतु कां परिसा. १८१
'जातां तुह्मी वदे तो आह्मां, अच्छोदनाम पुण्यसरीं

'सारुनियां स्नानातें जाऊं आपण उद्यांच सर्व घरीं. १८२
'स्नान करी मग तेथें; तों कांहीं पाहुनी चमत्कार
'झाला भ्रमिष्ठ, वाटे होय तयालागिं भूतसंचार. १८३
'ऐशा स्थितींत असतां बोले आह्मांस तो धरानाथा!
'जा सर्वही तुह्मी जा सत्वर इकडून मी न यें आतां!' १८४
'केले उपाय पुष्कळ, परि तो सोडी न आपला हट कीं;
'ऐसें पाहुनि केलें मग तिकडून प्रयाण ह्या कटकीं.' १८५
हें परिसून स्वमनीं राव ह्मणे, हेतु कोणता धरुनी
नकळे स्वमित्र तिकडे राहे दृढनिश्चयास ह्या करुनी. १८६
कांहीं असो, स्वयें मी जाइन आतांच त्याकडे थेट.
तिकडेच मत्प्रियाही आहे, होइल तिचीहि मज भेट. १८७
ऐसा निश्चय करुनी जाय पुरीं; मंत्रिमंदिरीं ताता
भेटे; आश्वासन दे शुकनासाहि स्वपुत्रविरहार्ता. १८८
तारापीड स्वसुता बोले—' कांहीं असेल तव दोष,
'वैशंपायन ह्मणुनिच आला नाहीं धरोनियां रोष.' १८९
चंद्रापीड अशी ही परिसुनि जनकोक्ति बोलिला त्यातें—
'द्या मज आज्ञा तरि ह्या क्षाळाया अपयशःकलंकातें.' १९०
हें ऐकतांच बोले तारापीडास मंत्रि शुकनास—
'वदतां काय असें जें ऐकायाही अयोग्य कानांस? १९१
'वर्ते पशुप्रमाणें जो माझा पुत्र तो कशाचा हो?

'त्याच्या अपराधाचीं स्वांगें भोगीत तो फळें राहो!' १९२
मंत्रिमुखें जनकाची आज्ञा मिळतांच, हस्तगत आतां
कादंबरी खरोखर झाली वाटे असेंच नरनाथा. १९३
कष्टें मातापितरीं सचिवानेंही निरोप त्या देतां,
चंद्रापीड पुन्हा त्या अच्छोदीं शीघ्र जाहला येता. १९४
करितां शोध तिथें तो न दिसे, कांहीं न त्या स्थळीं थांग
त्याचा लागे, ह्मणुनी चित्तीं भावीतसे महाभाग; १९५
हंसीकडे कदाचित् गेला असल्यास त्याचिया वृत्ता
जाणत असेल ती; ह्या भावें नृप होय त्या स्थळीं जाता. १९६
जाय तिथें तों पाहे, हंसी होऊन दीनमुख पडली;
सांवरि तिला तरलिका; गोष्ट ह्मणे नृप अनिष्ट ही घडली. ९७
राजा ह्मणे तरलिके 'आर्येच्या ह्या अमोघ दुःखास
'कांहीं तरी असावें कारण मोठेंच जाहलें खास. १९८
'आलों असोनि जवळी पाहेना आज मजकडे कां ही?
'कांहींच कां न मजशीं बोले? कां मौन धरुनियां राही?'
नृप तरलिकेस ऐसें वदला तें ऐकुनी ह्मणे हंसी—

राजकुमारा, तिजला यावी ती सांगतां कथा कैसी? २००
दुःखद वृत्त तुला तें ऐक नृपा मीच सांगतें सकल;
जें वदतां वक्ताच न व्हावा श्रोताहि ऐकतां विकल. २०१

गेलां तुह्मी घरा हें परिसुनि झाली निराश ती देवी;
स्वप्राण शोषवाया तीव्रतपें मीहि या स्थळा सेवीं. २०२
एके दिवशीं कोणी पाहियला द्विजकुमार म्यां इकडे
तुमच्या बरोबरीचा; मोह तया मज विलोकितांच जडे. २०३
मज वदला 'तरुणी कां तप करिशी? काय मानसीं आहे?
'वांण असेल तुला तरि पंचशर व्यर्थ कार्मुका वाहे! २०४
'मन्मन विव्हल झालें सुतनु! तुझ्या पाहतांच रूपातें;
'रक्षीं मज, निज पांचहि बाणीं कदर्प विंधितो मातें.' २०५
मी दुष्ट भाव त्याचा जाणुनि कांहीं न बोललें त्यास;
गेलें दूर सखीला सांगुनि वारावयास तो त्रास. २०६
आलिंगन मज द्याया पुढती पसरोनि आपले हात
तो मजपाशीं आला; होती तैं स्वच्छ चांदणी रात. २०७
'जाळून भस्म करिती मत्ता तुज कां न पंचभूतें तीं?'
ऐसें वदोनि कोपें झालें मी घोर शाप त्या देती. २०८
'तिर्यग्जाति शुकासम वटवट करिशी तशाच ह्या चेष्टा;
'तरि हो शुकचि! न करिशिल मग तूं हा दांडगेपणा नष्टा!'
ममशापें वा त्याच्या पापें तो भस्म तत्क्षणीं झाला;
कळलें मागुनि मज कीं, तुमचा तो मित्र होय भूपाला! २१०

हें ऐकतांच चंद्रा-पीड ह्मणाला तियेस—'ह्या जन्मीं

'सेवा करूं शकेना ध्या गंधर्वशकन्यकेची मी. २११
'घेईन जन्म दुसरा, त्यांहि असावें तयीं तिची आली.'
हें बोलतांच पडला राव उरस्फोट होउनी खालीं. २१२
बघुनि असें हंसीला सोडुनि धांवून तरलिका जाय,
'हा! हा!' ह्मणत धरी ती सांवरुनी निर्गतासु नृपकाय.२१३
हें पाहतांच हंसी करिती जो होय थोर आक्रांत,
वर्णन करील त्याचें ऐसा कोणी नसेल लोकांत! २१४
इकडे राजा आला अच्छोदीं आयकोनि हें, जातें
हंसीला भेटाया ऐसें सांगून मायबापांतें, २१५
मदलेखेसह सुंदर वस्त्रालंकार लेवुनी सुदती,
जाई नृपाकडे ती जैशी भेटावया स्मरास रती. २१६
जातां पथीं सखीला वदली देवी—'खराच आज जरी
'आला असेल ठक तो, भाषण त्यासह न मी करीन तरी.२१७
'जाऊं आपण आजीं राजकुमारासमीप त्या जेव्हां,
'वक्रोक्तींनीं त्यासह मदलेखे! तूंच बोल गे तेव्हां!' २१८
ऐसें बोलत चाले देवी कर धरुनि पत्रलेखेचा;
केयूर वाट दावी; तों ये आश्रम समीप हंसीचा. २१९
शिरतांच आश्रमीं त्या, रायाच्या पाहुनी अवस्थेला,
येई दुःखातिशयें मूर्छा गंधर्वराजकन्येला. २२०
सोडोनि पत्रलेखा देवीचा हात, ये नृपापाशीं;

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

देवी रडे ह्मणे—'मी कारण झालें मरावया याशीं!' २२१
मदलेखा तीस ह्मणे—'नको रडूं निजकुळाकडे पाहीं !
'त्यजितील प्राण तुझे वडिल तुझी ऐकुनी अवस्था ही. २२२
तीस ह्मणे ती—'मूर्खे ! वांचायाची असेल ज्यां आस
'निजजननीजनकांची चिंता असली तरी असो त्यांस! २२३
'मजला तों स्वप्राण-त्याग रुचे प्राणरक्षणाहून.
'जातें प्रियासवें मीं; काय करूं ह्या जगांत राहून? २२४
'दे याचकांस वांटुनि जें जें कांहीं असेल माझें तें;
'द्यावा मणिगिरि मुनिला; वीणा माझी तुलाच मी देतें. २२५
'जा जा! नको रडूं तूं! मदलेखे दे मदुक्तिला मान!
'आईचें बाबांचें तूंच करीं जाउनी समाधान!' २२६
देवी मग हंसीच्या कंठीं मारोनियां मिठी बोले;
'सखये काय करूं गे जन्मा येऊन मी वृथा गेलें! २२७
'जीव धरावा वाटे पुढच्या आशेवरी तरी तूतें;
'कांहीं परंतु नुरला माझ्या आधार जीवतंतूतें ! २२८
'सखये ! इच्छा आतां माझ्या इतकीच मानसीं वागे,–
'कीं मज तुझा समागम जन्मोजन्मीं असाच व्हावा गे!'२२९
पुष्पीं अर्चुनि नृपतनु मग ती स्वांकीं तदीय पायांस
ठेवुनि चुरितां बोले-' घडले बहु या मदर्थ आयास!'२३०
इतक्यांत नृपतनूंतुनि बाहेर श्वेतवर्ण भा पडली;

ती हंसकन्यकेला संचरुनी व्योममंडलीं वदली. २३१
'पूर्वी आश्वासन मीं तुज दिधलें, त्यामुळेंच वत्से ! तूं
'धरियेस जीव; तैसा धर; पुरतिल शेवटीं तुझे हेतु. २३२
'सुखरूप देह आहे माझ्या लोकांत पुंडरीकाचा;
'सरतां शाप खरोखर तुजशिं समागम घडेल गे त्याचा. २३३
'चंद्रापीडशरीरहि आहे मजसारखेंच अविनाशी;
'कादंबरीकरतल-स्पर्शेचि होईल पोषिता त्याशी. २३४
'शापांतीं त्याचीही होइल कादंबरीसवें भेट;
'यास्तव तद्देहाची जतन करो ती अहर्निशीं नीट.' २३५
ऐसें वदोनियां ती अंतर्धानास पावली ज्योति.
नवल विलोकुनियां तें विस्मित चित्तांत सर्वही होती. २३६
इंद्रायुधास संगें घेउनि इतक्यांत पत्रलेखाही
शिरली उदकीं, झाली गुप्त; न कोणासही कळे कांहीं. २३७
घटिकाद्वयावकाशें उदकाबाहेर एकल्या येतां
पाहुनि कपिंजलातें, नमुनि पुसे वृत्त त्या महाश्वेता. २३८
सांगुनि सर्वहि जें जें हंससुतेनें विचारिलें त्यास,
चंद्रापीडाचाही कथिला तेणें समग्र इतिहास. २३९

तो बोले— मन्मित्रासह जाउनि थेट चंद्रलोकाला
पुसलें विधूस म्यां कीं, 'कां रे! त्वां आणिलें इथें याला ?' २४०

चंद्र ह्मणे 'त्त्सख हा रात्रीं पावून कामसंताप,
'मज बोले-चंद्रा! मज पीडिसि तरि घे तुलाहि हा शाप:२४१
'जन्मोजन्मीं माझ्या शापें घेवोनि मर्त्यदेहास,
'ह्या मानवी विकारांपासुनि भोगीं असाच तूं त्रास.' २४२
'अपराधाविण देतां शाप मला म्यांहि शापिलें त्याला–
'दु:खी मजसम तूंही हो!' मग हंसी-वियोग त्या झाला.२४३
'घेईल तो स्वदोषें मजसह जन्मास दोनदा जेव्हां,
'जन्मोजन्मीं ही तत्-वाणी होईल बा सफल तेव्हां. २४४
'शापान्त होय तोंवर ह्याच्या रक्षीन मी शरीरा या;
'जा सांग तत्पित्याला यत्नें निजसुतहितास साधाया.'२४५
हें ऐकतांच जाईं धांवत मी श्वेतकेतुमुनिपाशीं;
त्या धांदलींत एक द्विज म्यां उल्लंघिला तपोराशि. २४६
कोपुनि अतिक्रमें ह्या दे मज तत्काळ शाप मुनि तो कीं–
'अश्वासम धांवशि, तरि अश्वचि होऊन जा धरा लोकीं.'२४७
नमुनि तया वदलों मी-'कामाच्या गडबडींत भान मला
'नव्हतें,ह्मणून माझ्या-पासुनि अपराध हा मुने घडला! २४८
'येई क्षमा न करितां तरि मग इतकें तरी मला द्या हो,
'कीं संगें स्वसख्याच्या हा जन जन्मांतरीं सदा राहो!'२४९
मुनि बोले-'निजसखिसखि-वाहन होऊन तूं रहाशील;
'होतां अंत धन्याचा शापापासून मुक्त होशील.'. २५०

मुनिवदनांतुनि ऐशीं वचनें निघतांच, होउनी वाजी
एक क्षणहि न लगतां पडलों मी सागरोदरामाजी. २५१

आश्चर्य थोर सर्वां वाटतसे ह्या कपिंजलोक्तीचें;
कादंबरी ह्मणे त्या-'सांगावें वृत्त पत्रलेखेचें.' २५२
येरू वदे-' तियेच्या कांहीं नेणेंच मी समाचारा;
' जातों स्वमित्रजनका कळवाया मी प्रकार हा सारा.'२५३
तो गेल्यावर देवी दिव्यगिरेचा धरून विश्वास
भावें नृपदेहार्चन करि अर्पुनि विविध दिव्य भोगांस. २५४
दुसरे दिवशीं पूर्वी होती जैशी तशीच लखलखित
नृपदेहकांति निरखुनि, झाली कादंबरी मनीं चकित. २५५
बोलावुनी सखींना ती दावी त्यांस तो चमत्कार;
तो पाहुनी मनाला त्यांच्याही हर्ष वाटला फार. २५६
आले होते जे जे चंद्रापीडासमागमें नृपती,
त्यांसहि वृत्त निवेदन करुनी तें, नृपशरीर दाखविती. २५७
सत्य प्रत्यय पाहुनि होउनि ते फार विस्मित स्वांतीं,
ह्मणती 'देवी! होइल तवयोगें शुभचि सर्वही अंतीं.' २५८
तों, तारापीडाचे आले आहेत दूत, परिसुनियां
चतुरक संगें देउनि परत फरी त्यांस चित्ररथतनया. २५९
ते उज्जनीस जाउनि राजाराणीस बोलती- 'स्वामी !

'अच्छोदाख्यसरस्तटिं राजकुमारास पाहिलें आह्मीं.२६०
'वृत्तांत श्रवण दुजा प्रभुजी ! ह्या चतुरकाकडोनि करा.'
कथितां वृत्त चतुरकें वाटे आश्चर्य खेदही नृवरा. २६१
अवलोकावा जाउनि त्याचा तो एकवार देह तरी,
ह्या इच्छेनें राजा परिवारासह तिथें प्रयाण करी. २६२
तिकडे जाउनि राजा पाहुनियां पूर्ववत् स्वसुतदेहा
मानी, प्रकार शुभची होइल कादंबरी-प्रभावें हा. २६३
आला नृप हें ऐकुनि हंसी तेथूनि शीघ्र जाय दुरी.
मोहतमीं त्या वृत्ता परिसुनि कादंबरीहि वास करी.२६४
पाहोनि ती अवस्था निजपुत्राची, रडे विलासवती;
तिजला वदता झाला होउनियां खिन्न मानसीं नृपति. २६५
'जीच्या भाग्यें आपण पाहतसों पूर्ववत् स्वसुतदेहा,
'त्या आपल्या स्नुषेचा शोक मला दुःख फारची दे हा. २६६
'कादंबरी पहा ती आज किती खिन्न जाहली आहे;
'सांत्वन तिचें करावें आधीं त्वां योग्य होय तुजला हें.' २६७
स्वांकीं चैत्ररथीला बसवुनि ही ऐकतांच पतिवाणी,
स्वकरें पुसुनि तिचें मुख लोचनही, बोलली तिला राणी; २६८
'भाग्यें तुझ्याच वचतें संप्रति मी ह्या स्वपुत्रदेहातें;
'होई सावध होई शोक नको गे नको करूं माते!' २६९
हें ऐकतांच नमुनी सासूश्वशुरांस बैसती झाली

ती सासूच्या मागें, लज्जेनें मान घालुनी खालीं. २७०
सोंपून पूर्ववत् सुत-तनुरक्षण त्या सुनेकडे राजा
जाय तपा सचिवासह संगें घेवोनि आपली भाजा. २७१

त्या सर्वेहि मुनिवर्या इतकें शुकवृत्त सांगुनीयां हें,
बोले **जा**बालि-‘ कथा फारचि ही आज लांबली आहे. २७२
‘ कथिला प्रकार म्यां जो आहे अद्यापि तो तसाच पहा;
‘ द्विज तो मुकुनि स्वर्गा चांचल्यें जाहला असे शुक हा.’ २७३
कीर ह्मणे—मुनिवर्यें ह्या माझ्या सांगतांच चरितातें
**शू**द्रक राया ! सर्वेहि जन्मद्वयवृत्त आठवे मातें. २७४
वदलों मुनीस नमुनी ‘जाऊं द्या आजची मला तिकडे,
‘ममदोषें जेथें तो हृदय फुटोनी मदीय मित्र पडे.’ २७५
प्रेम मनांत; परी मज दाउनि बाहेर कोप, **जा**बालि
बोले-‘चंचलता तव नष्ट न अझुनीहि काय रे ! झाली ? २७६
‘सामर्थ्य जावयाचें जेव्हां येईल बा तुझ्या आंगीं,
‘तेव्हां तिथें सुखें त्वां जावें; तोंवर रहाच ह्या जागीं !’ २७७
**हं**सीचें प्रेम तसें तें **चं**द्रापीडसख्यही राया !
स्मरतां मी त्या दोघां-जवळी झालों उतावळा जाया. २७८
स्वपित्या **हा**रीत पुसे ‘ मुनिसुत अल्पायु केविं हा झाला ?’
‘स्त्रीवीर्यें हा उपजे, कारण’ **जा**बालि ‘हें’ ह्मणे ‘त्याला’. २७९

चंद्र ह्मणे ‘ त्वत्सख हा रात्रीं पावून कामसंताप,
‘ मज बोले-चंद्रा! मज पीडिसि तरि घे तुलाहि हा शाप:२४१
‘ जन्मोजन्मीं माझ्या शापें घेवोनि मर्त्यदेहास,
‘ह्या मानवी विकारांपासुनि भोगीं असाच तूं त्रास.’ २४२
‘ अपराधाविण देतां शाप मला म्यांहि शापिलें त्याला–
‘दु:खी मजसम तूंही हो!’ मग हंसी-वियोग त्या झाला.२४३
‘ घेईल तो स्वदोषें मजसह जन्मास दोनदा जेव्हां,
‘जन्मोजन्मीं ही तत्-वाणी होईल बा सफल तेव्हां. २४४
‘ शापान्त होय तोंवर ह्याच्या रक्षीन मी शरीरा या;
‘जा सांग तत्पित्याला यत्नें निजसुतहितास साधाया.’२४५
हें ऐकतांच जाई धांवत मी श्वेतकेतुमुनिपाशीं;
त्या धांदलींत एक द्विज म्यां उल्लंघिला तपोराशि. २४६
कोपुनि अतिक्रमें ह्या दे मज तत्काळ शाप मुनि तो कीं–
‘अश्वासम धांवशि, तरि अश्वचि होऊन जा धरा लोकीं.’२४७
नमुनि तया वदलों मी-‘कामाच्या गडबडींत भान मला
‘नव्हतें,ह्मणून माझ्या-पासुनि अपराध हा मुने घडला! २४८
‘यिई क्षमा न करितां तरि मग इतकें तरी मला द्या हो,
‘कीं संगें स्वसख्याच्या हा जन जन्मांतरीं सदा राहो!’२४९
मुनि बोले-‘निजसखिसखि-वाहन होऊन तूं रहाशील;
‘ होतां अंत धन्याचा शापापासून मुक्त होशील.’ २५०

मुनिवदनांतुनि ऐशीं वचनें निघतांच, होउनी वाजी
एक क्षणहि न लगतां पडलों मी सागरोदरामाजी. २५१

आश्चर्य थोर सर्वा वाटतसे ह्या कपिंजलोक्तीचें;
कादंबरी ह्मणे त्या-'सांगावें वृत्त पत्रलेखेचें.' २५२
येरू वदे-' तियेच्या कांहीं नेणेंच मी समाचारा;
' जातों स्वमित्रजनका कळवाया मी प्रकार हा सारा.' २५३
तो गेल्यावर देवी दिव्यगिरेचा धरून विश्वास
भावें नृपदेहार्चन करि अर्पुनि विविध दिव्य भोगांस. २५४
दुसरे दिवशीं पूर्वी होती जैशी तशीच लखलखित
नृपदेहकांति निरखुनि, झाली कादंबरी मनीं चकित. २५५
बोलावुनी सखींना ती दावी त्यांस तो चमत्कार;
तो पाहुनी मनाला त्यांच्याही हर्ष वाटला फार. २५६
आले होते जे जे चंद्रापीडासमागमें नृपती,
त्यांसहि वृत्त निवेदन करुनी तें, नृपशरीर दाखविती. २५७
सत्य प्रत्यय पाहुनि होउनि ते फार विस्मित स्वांतीं,
ह्मणती 'देवी! होइल तवयोगें शुभचि सर्वही अंतीं.' २५८
तों, तारापीडाचे आले आहेत दूत, परिसुनियां
चतुरक संगें देउनि परत करी त्यांस चित्ररथतनया. २५९
ते उज्जनीस जाउनि राजाराणीस बोलती- 'स्वामी !

ऐसा गोड कथारस पाजुनियां त्या समस्त विप्रांस,
जाबालि ह्मणे-'द्विजहो आटपली रात्र वाटतें खास! २८०
'जाऊं.या स्नानाला, स्नानाची वेळ जाहली आतां.'
ऐसें सांगुनि सर्वां, तेथुनि तो जाहला स्वयें जाता. २८१
हारीतहि स्वकार्यां शयनीं ठेवूनियां मला जाय;
मी स्मरुनी निजदु:खा चित्तीं चिंतीं-पुढें करूं काय? २८२
तों येउनि मजपाशीं मजला हारीत सांगता झाला
कीं 'शोधीत तुला तव मित्र कपिंजल इथें असे आला.' २८३
हें ऐकतांच, नव्हतें मजला सामर्थ्य त्या स्थलीं जाया
ह्मणुनी तयास विनवीं मी मज मित्रासमीप त्या न्याया. २८४
पाहुनि कपिंजलातें मज वाटे कीं, उडून जाऊन
चुंबन घ्यावें त्याचें गाढालिंगन तयास देऊन. २८५
न रिघे शब्द मुखांतुनि, दाटुनि ये कंठ, फार गहिंवरलों;
सद्गदित दीनवाणी काढुनि अंतीं सख्यास मी वदलों. २८६
'जन्मद्वयीं सख्या मज तव दर्शन हेंच होय रे आतां!
'हा हा!सर्वहि होती विमुख विमुख एक झालिया धाता!' २८७
रडला फारचि तेव्हां तो मम चरणास ठेवुनी स्वशिरीं;
नाना मधुरोक्तींनीं तैं त्याच्या सांत्वनास मीहि करीं. २८८
तो सप्रेम ह्मणे मज-"कळलें हें वृत्त आपल्या वडिलां;
"आहे यत्नहि त्यांनीं शमवाया हें अरिष्ट चालविला. २८९

"संप्रति तिर्थंच आहे लक्ष्मी माता तुझी; तिनें तैशी
" तातानेंही तुझिया आज्ञा केली असे तुला ऐशीः— २९०
"कीं-'त्वद्दुःख शमावें ह्मणुनि अनुष्ठान चाललें जें, तें
'संपूर्ण होय तोंवर सोडुनियां चंचल स्वभावातें २९१
'अससी आज जिथें तूं, तिकडेच स्वस्थमानसें राहीं;
'सुखचि पहाशील पुढें, चित्तीं चिंता धरूं नको कांहीं." २९२
माझ्या वडिलांचा हा देउनि मजला निरोप वदला तो—
'त्वज्जनकास तुझें हें कळवाया वृत्त मीं तिथें जातों.' २९३
गेल्यानंतर माझा मित्र कपिंजल वदोनि मजला हें,
कांहीं दिवस सुखें मी जाबालीच्याच आश्रमीं राहें. २९४
ऐसें असतां एके दिवशीं मजलाच वाटलें कीं, मी
आतां समर्थ झालों आहें जाया उडोनियां व्योमीं. २९५
गेलों शीघ्र भरारी मारुनि गगनीं, परी पुढें जेव्हां
थकलों, निजलों जाउनि एका वृक्षाचिया तळीं तेव्हां. २९६
तिकडे पाशीं गोंवुनि अंत्यज मजला धरोनि कोणी ने;
ऐसें पाहुनि दुःखें विनवीं मी त्यास दीनवाणीनें. २९७
'सोड! नको मज मारूं! जातिस्मर[१] मुनिकुमार मी सुमुखा!
'असती दुसरे खग जा! रक्षीं मत्प्राण पावशील सुखा.' २९८
हांसुनि मला ह्मणे तो 'बाबा माझ्या धन्यास एक असे

---

१ पूर्व जन्माचें अथवा जातीचें स्मरण ज्यास झालें आहे तो.

‘बहु लाडकी कुमारी; कोणाच्या ती मुखें असें परिसे २९९
‘कीं, कीर एक आहे जाबालीच्या मठांत फार गुणी;
‘हें ऐकुनि आह्मां ती सांगे आणावया तया तरुणी. ३००
‘हिंडत होतों आह्मी बहुजन त्याच्या करीत शोधातें;
‘इतक्यांत ह्या ठिकाणीं आलों, तों लाभलास तूं मातें. ३०१
‘नेतों तिजपाशीं मी, ती आहे स्वामिणी तुझी; तुजला
‘सोडो वा ठेवो ती’ नेई ऐसें ह्मणून तो मजला. ३०२
पाहुनि मला ह्मणे ती-‘आतां जाशील तूं कुठें वत्सा ?’
मग पिंजऱ्यांत घाली ती मज माझी करोनियां कुत्सा. ३०३
धिक् पुंडरीक ! झाली काय दशा प्राप्त आज ही तूतें !
पडशी चांडाळकरीं हारवुनी मुनिकुमारपदवीतें ! ३०४
उल्लंघिशि गुरुवचना शिक्षा तुज योग्य होय ही ह्मणुनी—
मी आपणा असें बहु निंदुनि निश्चय करीतसें स्वमनीं ! ३०५
‘कीं होय मुक्त तोंवर कोणाशीं बोलणार मी नाहीं;
‘खाणेंपिणेंहि सोडुनि शिणवीन स्वीय निंद्य काया ही !’ ३०६
ती चांडाळसुता म्यां खावें प्यावें ह्मणून फार झटे;
परि चिवचिवून त्याचा त्रास करीं, मी न खाय जों न सुटें. ३०७
‘हें काय!’ ती ह्मणे ‘कां खाशी पीशी न? काय दोष फळीं?
‘अंत्यजजलही आहे शुद्धचि, तें जों पडे न भूमितळीं. ३०८
‘असता विचार तुजला तरि होती ही तुझी दशा काय ?

'प्रथमचि तसें करावें न पुढें अनुताप ज्यामुळें होय.' ३०९
परिसुनि तदुक्ति ही मी करुनि फलाहार पीतसें तोय;
प्रतिकूल काल माझा मजला अनुकूल यापुढें होय. ३१०
दुसरे दिवशीं प्रातःकालीं जों पाहतों मनुष्यवरा !
तों मज तो भिल्लांचा ग्राम दिसे दिव्यलोकची दुसरा. ३११
चांडाळकन्यकाही ती दुसरी इंदिराच मज वाटे;
मणिमय निजपंजरही बघतां आश्चर्य मन्मनीं दाटे. ३१२
पुसणार मी तिला कीं, काय चमत्कार हा असे, तंव ती
घेउनि ये मज इकडे; पुढचें सारें पुसा तिला नृपती. ३१३

पुसतां तिला नृपानें, योजुनि संबोधनें सुयुक्तें, ती
निजविस्मृतरूपाची स्मृति राजेंद्रास जाहली देती. ३१४
'भगवन् चंद्रापीडा ! त्रैलोक्यानंद ! रोहिणीकांता !
'कादंबरीहृदब्जाल्हादा ! हा स्वाप्त ओळखीं आतां ! ३१५
''हा शापमुक्त होई तोंवर बंधांत ठेवुनी ह्यातें
''अनुतापा पावूं दे;' कथिलें ह्याच्या असें मला तातें. ३१६
'आलें आहें ज्याला घेउनियां मी तुझ्याकडे आतां,
'त्या ह्या तुझ्या सख्याची होय नृपा मीच इंदिरा माता. ३१७
'हे निंद्य देह सोडा, जा तुमचा शाप ह्यापुढें सरला;
'चिरकाळ घ्या सुखें तीं भोगुनि यत्काम मानसीं धरला.' ३१८

ऐसें वदोनियां ती अंतर्धानास पावली **क**मला;
**का**दंबरीप्रियेच्या स्मरणें राजाहि तत्क्षणीं भ्रमला. ३१९
रायास ताप फारचि देई **का**दंबरीवियोगशिखी;
**स्मर**ही तशांत विंधी त्याच्या हृदयास आपल्या विशिखीं. ३२०
पाहुनि भूपदशा ही सोडी निंद्य स्वकीय देह शुक;
झाले तटस्थ सारे चित्रापरि हें विलोकुनी कुतुक. ३२१
इकडे **मा**धवमासीं रात्रीं, रत्नांबरीं स्वकांतातें
शृंगारुनि, आलिंगी देवी कामार्त होउनी त्यातें. ३२२
आलिंगनें तिच्या त्या संज्ञा पावून शीघ्र तोहि तिला
कवळी स्वभुजीं हर्षें; हर्ष तयांचा न जाय तो कथिला. ३२३
ती भ्याली हें पाहुनि बोले दीर्घस्वरें तिला नृवर;
'भितरे भिऊं नको गे करिं मजसह रतिविलास कल्पवर. ३२४
'वदलों होतों मी कीं, प्रायः **का**दंबरीकरस्पर्शें
'वपु हें अविनाशि असे; होय सजीवहि तुझ्याच आश्लेषें. ३२५
'त्यजिला म्यां तो शापें प्राप्त मला मर्त्यदेह जो झाला;
'त्वत्प्रीतिस्तव परि ह्या **वि**धुलोकींही धरीन देहाला. ३२६
'पतिही तुझ्या सखीचा ममलोकीं **पुं**डरीक तो आहे;
'सत्वर भेटविशीलचि **हं**सीशीं त्यास तूं वरारोहे!' ३२७
तों **पुं**डरीकही निज-मित्राचा निजकरें कर धरून,
येई नभोपथानें त्याच स्थानीं वरून उतरून. ३२८

एकावली तयाच्या विलसत होती गळ्यांत मोत्यांची;
झाली होती फिक्कट तनुही विरहज्वरामुळें त्याची. ३२९
पाहुनि हें, स्वसखीला करुनी आनंदवृत्त तें विदित
सुखवावया तियेला गेली देवी तिच्याकडे त्वरित. ३३०
चंद्रापीडहि कंठीं स्वसख्याच्या मारुनी मिठी, त्यातें
बोले 'आहे माझ्या जामाताचें तुझ्याकडे नातें. ३३१
'पावोनि अन्य देहा संप्रति मन्मित्र जाहलास तरी,
'वर्तें मजशीं आतां संतत मित्रापरीच कल्पवरी.' ३३२
**हं**सा **चि**त्ररथा हें **के**यूरक जाय वृत्त सांगाया;
**म**दलेखाही गेली **ता**रापीडास संमुदा द्याया. ३३३
ती बोले-'सुत तुमचा सचिवसुतासह सजीव झाला' ! हें
ऐकुनियां नृप भावी निजतनु आनंदसागरीं पोहे. ३३४
सुतसंजीवनवृत्तें आनंदाचेंच होउनी पात्र,
भार्येसह नृप सचिवा पुसता झाला-कुठें असे पुत्र ? ३३५
पाहून त्यांस चंद्रा-पीड पित्याच्या नमी चरणयुगुला;
वंदुनि मग मातेला सचिवालाही, धरातलीं बसला. ३३६
बोले पिता तया-'तूं माझा झालास पुत्र जरि अधुना,
'तूं **वि**धु हें मी जाणें; अससि मला वंद्य जेंवि सर्व जनां.' ३३७
स्वापत्यप्रेमाचा पान्हा फुटुनी जिचे स्तन स्रवती,
आलिंगन निज पुत्रा देई ती मायही **वि**लासवती. ३३८

तों निज पुत्राविषयीं शंका उत्पन्न होय सचिवाला;
ऐसें पाहुनि चंद्रा-पीड तयालागिं बोलता झाला. ३३९
'वैशंपायन तुमचा पुत्र पहा हा तुह्मांप्रती वंदी!'
यावरि सचिवा तत्सुत-वृत्तहि कांहीं कपिञ्जल निवेदी.३४०
तो बोले त्यास-'तुह्मां मुनिवर्य श्वेतकेतु हें वदला
'कीं,-शापमुक्त माझा पुत्र जरी ग्राह्य होय हा मजला,३४१
'मत्तेज तरी ह्याच्या ठायीं स्थापोनि सत्यलोकास
'मी जातों; ह्मणुनी त्वां धाष्टर्यापासून रक्षिजे यास.' ३४२
हें ऐकतांच धरिला निजकंठीं पुंडरीक त्या सचिवें;
स्नेह प्रभुमायेनें पूर्वाधिक त्या परस्परीं प्रभवे. ३४३
हंसीहि पुंडरीका पाहुनि आनंद पावती झाली;
स्वांकीं घे तो हर्षें, घाली लाजोनि मान ती खालीं. ३४४
ते हंस चित्ररथही हर्षति पाहूनि जावयां उभयां;
स्वपुरीं नेउनि देउनि तनया, देती वरी स्वराज्य तयां.३४५
चंद्रापीडाचें जें वांछित संप्राप्त त्यास होतां तें,
कादंबरीसवें घे रात्रीं तो रतिसुखोपभोगातें. ३४६
प्रियकरकराब्ज नीवी-पासुनि सारी सलज्ज ती मागें;
ये घर्म; कंठ दाटे; होती रोमांचितें तिचीं अंगें. ३४७
अर्धेच नेत्र उघडी पावुनि आलिंगनें सुखातिशय;
तदधरसुधारसा पी नृप; पुढचा ये न वर्णितां विषय.३४८

ऐशी चंद्रापीडें क्रीडा कादंबरीसवें केली;
स्वानुभवेंच मनानें जाणावी ती, न जाय कथिजेली. ३४९
हंसीस पावुनीयां रमला चिर पुंडरीकही तिजशीं;
नित्य प्रीति वसे त्या उभयीं चक्राव्हयद्वयांत जशी. ३५०
यावरि चंद्रापीडा देवी ऐसें विचारिती झाली
कीं 'नाथ! पत्रलेखा कोठें ती आपली असे आली?' ३५१
भूप ह्मणे-'शाप मला झाला जाणून, मर्त्यभूमाजी
'ती रोहिणीच आली होती सेवा करावया माजी. ३५२
'गेली स्वर्गीं; इच्छित होती इकडे पुन्हाहि याया ती;
'परि मीच वारिली; तूं तिजला बघशील माझिया प्रांतीं. ३५३
'गंधर्वलोक जैसा हा, तो तैसाच लोक माझाही
'आहे तुझाच देवी! ह्यांत तुला जो रुचे तिथें राहीं.' ३५४
गंधर्वभूंत कांहीं क्रमुनी दिन, येउनी पित्यापाशीं,
भेटूनि राजपुत्रां स्वसम करी तो स्ववैभवें त्यांशीं. ३५५
निजमित्रावर सोंपुनि राज्याचा सर्व भार भूपाळ
क्रीडा निजप्रियेसह करुनि सुखानें क्रमीतसे काळ. ३५६
उज्जयनींत पित्याच्या प्रीतिस्तव तो कधीं करी वास;
प्रीत्यर्थ रोहिणीच्या जाय कधीं तेंवि चंद्रलोकास; ३५७
देवीच्छेस्तव जाउनि गंधर्वपुरीं कधीं विहार करी;
मित्रप्रीत्यर्थ कधीं अच्छोदींही वसून सौख्य वरी. ३५८

ह्यापरि चंद्रापीड क्षितिपति, कादंबरीहि तद्भार्या,
तो पुंडरीक, तैशी तद्रमणी हंसकन्यका आर्या, ३५९
हीं चौघेंहि निरंतर अन्योन्यांच्या समागमें वास
करुनी, वरितीं झालीं संतत परमावधि प्रमोदास. ३६०
कवि धुंडिराज ज्याच्या वंशाची होय पिंगळे अभिधा-
ही आवडो तयाची अभिनवकादंवरी कथा विबुधां. ३६१

समाप्त.

## शुद्धिपत्र.

| आर्या. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ७८ | २ | करि | करिं. |
| ८२ | २ | बघत। | बघतां. |
| ९१ | २ | किंपुरुष वर्षनाथा | किंपुरुषवर्षनाथा. |
| ११२ | १ | देवी ही | देवीही. |
| १४३ | २ | गंधर्व राजनगरा | गंधर्वराजनगरा. |
| १५० | २ | शंकावृर्ता | शंकावर्ती. |
| ३४७ | २ | धरा लोकीं | धरालोकीं. |